# मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय, अंबाजोगाई

## ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७

## अहवाल

# महाविद्यालयातील कार्यक्रम

- दि. ०२ ऑक्टोबर २०१७ : आजी – माजी विद्यार्थ्यांचा मेळावा
- दि. १३ ऑक्टोबर २०१७ : डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा. करण्यात आला. प्रा. किसन शिनगारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- दि. ११.११.२०१७ : राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त निबंध स्पर्धा घेण्यात आली. यात प्रथम – विलास विटेकर, द्वितीय – कल्पना गोरे, तृतीय – सिमा सोरडगे
- दि. १५.११.२०१७ : बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव व प्रा. हानुमंत साळुंके यांनी मार्गदर्शन केले

## महाविद्यालयातील कार्यक्रम

- दि. २७.११.२०१७ : ''भारतीय संविधान आणि सद्यस्थिती'' या विषयावर प्रा. सुकेशिनी जोगदंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- दि. २८.११.२०१७ : महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.
- दि. १६.१२.२०१७ : ''मूल्य शिक्षण'' या विषयावर ॲड. नरेंद्र राजपुरोहित यांचे व्याख्यान झाले. यावेळी प्रास्ताविक कार्यवाह श्री. अनिकेत लोहिया यांनी केले.

# विद्यार्थी सहभाग

- ०२ ऑक्टोबर २०१७ महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त गांधी विचार संस्कार परीक्षा घेण्यात आली. यामध्ये खालील विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविले.

| अ.क्र. | एम.एस.डब्ल्यू. प्रथम वर्ष | श्रेणी | एम.एस.डब्ल्यू. द्वितीय वर्ष | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | खराडे प्रियंका सुधीर | प्रथम | गोरे निखील हरिश्चंद्र | प्रथम |
| २ | डोंगरे जितेंद्र नामदेव | द्वितीय | फोलाने सिमा नागोराव | द्वितीय |
| ३ | लोमटे बालाजी अंगदराव | तृतीय | | |

# विद्यार्थी सहभाग

- रॅली : दि. ०५.१०.२०१७ : ‘समाजकार्य पदवीधरांच्या हक्कासाठी लढा’’ रॅली मध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी सहभागी
- केंद्रीय युवक महोत्सव : शास्त्रीय तालवाद्य, प्रहसन (नाटीका), इन्स्टॉलेशन, प्रश्न मंजुषा, पोवाडा, भारूड, लोकगीत या ०७ कलाप्रकारामध्ये १४ विद्यार्थी व ०३ विद्यार्थीनी असे एकूण १७ विद्यार्थी/विद्यार्थीनी सहभागी झाले
- आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा : स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय अंबाजोगाई येथे आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला होता.

# कर्मचारी सहभाग

- दि. ०५.१२.२०१७ ते ०९.१२.२०१७ या काळात डॉ. शेख नजीर व डॉ. अरूंधती पाटील हे शॉर्ट टर्म कोर्स साठी नागपूर येथे गेले होते.
- २१ डिसेंबर २०१७ रोजी श्री. रामदास काळे सहाय्यक ग्रंथपाल हे दयानंद महाविद्यालय लातूर येथे एक दिवशीय राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभागी झाले होते. **ICT Enabled Automation for Higher Education Institutions** या विषयावर मास्टर्स सॉफ्टवेअर नागपूर यांनी हे चर्चा सत्र आयोजित केले होते.

# महाविद्यालयाच्या वतीने सत्कार

- डॉ. अरूंधती पाटील यांची विद्यापीठाच्या विद्या परीषदेवर निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
- जीवन साधना फाऊंडेशन वसमत यांच्या वतीने समाजसेवेसाठी दिला जाणारा राज्यस्तरीय जीवन साधक पुरस्कार श्री. अनिकेत लोहिया यांना दि. २४ डिसेंबर २०१७ रोजी मिळाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव यांनी सत्कार केला.

# इतर

- महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन रू. २७७७८/– आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबासाठी अर्थसहाय्य म्हणून मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये इंटरनेट बँकींगद्वारे वर्ग करण्यात आले.
- डिसेंबर २०१७ अखेर ग्रंथालयात ५३७६ ग्रंथ आहेत. अहवाल काळात मा. द्वारकादास लोहिया (बाबुजी) यांनी १०९ ग्रंथ, मा. कार्यवाह यांनी 'अस्वस्थ' या ग्रंथाच्या ०८ प्रती, प्रा. रामकृष्ण डिघोळकर यांनी ०५, मा. श्री. धीरज वाटेकर चिपळूण यांचेतर्फे ०१ ग्रंथ तसेच डॉ. अनघा लवळेकर पुणे यांनी ०५ ग्रंथ महाविद्यालयास भेट दिली.
- २०१६–२०१७ परीवर्तन प्रकल्पाचे ऑडीट करून घेण्यात आले.
- मानवलोक रिसर्च बुलेटिनची वर्गणी ०२ सभासदांनी जमा केली.
- स्कूल बस फिल्डवर्क साठी वापरण्यात येते.